# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** सटाणा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0182 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/03/2025 14:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 16/12/2024
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/12/2024
**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/03/2025 **Time (वेळ):** 14:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/03/2025 14:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मंडळ अधिकारी कार्यालय ,सटाणा, सटाणा,सटाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रामसिंग विठ्ठल ठोके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | द-हाणे,सटाणा,सटाणा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | द-हाणे,सटाणा,सटाणा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9970122517

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | योगेश ज्ञानेश्वर जाधव | | | 1. तलाठी ठेंगोडा,सटाणा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | संजय गंगाधर साळी | | | 1. सर्कल सटाणा,सटाणा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद सटाणा पोलीस ठाणे
दिनांक 11/03/2025

माझे नाव रामसिंग विठ्ठल ठोके वय 43 वर्ष, व्यवसाय षेती, रा. मु. द-हाणे, पोस्ट मुंजवाड, ता. सटाणा, जि. नाशिक मोनं. 9970122517
समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. माझा भाउ हरसिंग विठ्ठल ठोके व माझे बहीणीचे सासरे श्री. छबु रंगनाथ मोकाटे यांची ठेंगोडा शिवारात गट नं. 175/2 या गटात सुमारे 75 आर बागायत शेतजमीन आहे. सदर शेतजमीनी पैकी त्यांनी 15 आर बागायत शेतजमीन माझा मुलगा नामे विनोद रामसिंग ठोके याचे नावावर दिनांक 09/10/2024 रोजी नोंदणीकृत खरेदी खताव्दारे विक्री केली आहे. सदर शेतजमीनीचे सातबारा उता-यावर माझे मुलाचे नाव लागणेकामी मी सुमारे महीनाभरापुर्वीच ठेंगोडा येथील तलाठी श्री जाधव तात्या यांचेकडे खरेदीखताची प्रत तसेच इंडेक्स - 2 असे कागदपत्र देवुन आलो आहे. मात्र वारंवार त्यांना माझे कामानिमित्त भेटून देखील त्यांनी अदयापपावेतो काहीएक कार्यवाही केलेली नाही अथवा केलेल्या कार्यवाही बाबत मला काही कळविलेले देखील नाही. मागील आठवडयात माझे कामासंदर्भात मी सर्कल साळी भाउसाहेब, सटाणा यांची त्यांचे कार्यालयात सटाणा येथे भेट घेतली असता त्यांनी ''तुझे काम होणे अवघड आहे. तरीपण तु तलाठी जाधव तात्या यांना भेट मग बघु, आम्ही चर्चा करतो'' असे सांगीतले. त्यानुसार मी ठेंगोडा येथील तलाठी जाधव तात्या यांची काल दिनांक 09/12/2024 रोजी भेट घेतली असता त्यांनी मला सांगितले की, '' सर्कल भाउसाहेब यांनी सदर कामाकरीता 25 हजार रू लागतील असे सांगीतले असुन सदर पैसे दिले तरच तुझे काम होईल'' असे सांगुन माझेकडे 25 हजार रू लाचेची मागणी केली आहे. मला त्यांना लाचेची रक्कम दयायची ईच्छा नसल्याने मी तेथुन निघुन आलो व लाचलुचपत विभाग नाशिक येथे फोन करून माझी तक्रार कळविली होती. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक येथे फोन करून कळविलेल्या तक्रारीचे अनुशंगाने लाप्रवि नाशिक येथील पोलीस उप अधिक्षक श्री. बडगुजर साहेब हे दिनांक 10/12/2024 रोजी सावकी फाटा, सटाणा येथे आले. त्यावेळी त्यांनी त्यांचेसोबत असलेले शासकीय पंच व सापळा पथकाचे अंमलदार याचेशी माझी ओळख करून दिली. त्यावेळी मी त्यांना हकीगत सांगुन लाच मागणी संदर्भातील माझी तक्रार माझे हस्ताक्षरात पंचांसमक्ष लिहुन दिली असुन त्यावर मी तसेच पंचांनी सहया केल्या आहेत.
मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने सर्कल साळी भाउसाहेब सटाणा व ठेंगोडा येथील तलाठी जाधव तात्या हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी मला व पंच श्री. अंबादास बाबुराव थोरात अशांना पडताळणी कारवाईकामी आवष्यक सुचना देवुन माझेकडे व्हाईस रेकार्डर चालु करून देवुन सुरवातीला मंडळ अधिकारी कार्यालय सटाणा येथे सर्कल साळी भाउसाहेब यांचे भेटीसाठी रवाना करण्यात आले. त्याप्रमाणे मी व पंच श्री थोरात असे मंडळ अधिकारी कार्यालय सटाणा येथे जावुन श्री साळी भाउसाहेबांची भेट घेतली व मी त्यांचेकडे माझे कामाविशयी चर्चा केली. या दरम्यान सर्कल साळी भाउसाहेबानी ''आम्हालाच अधिकार हे, तो नही विशय... तुम्हाला परस्पर या दुकानात, त्या दुकानात नही जाता येत, तसेच तात्याशी बोलुन घ्या'' असे सांगुन माझेकडुन मुलाचे नावाचे खरेदी केलेल्या जमिनीच्या खरेदीखताचे इंडेक्स 2 व सातबारा उता-याची झेरॉक्स प्रत मागुन घेतली होती. त्यानंतर ठेंगोडा येथील तलाठी जाधव तात्या हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी मला व पंच श्री. अंबादास बाबुराव थोरात अशांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन माझेकडे व्हाईस रेकाँर्डर चालु करून देवुन तलाठी कार्यालय ठेंगोडा येथे तलाठी जाधव तात्या यांचे भेटीसाठी रवाना करण्यात आले. त्याप्रमाणे मी व पंच श्री थोरात असे तलाठी कार्यालय ठेंगोडा येथे जावुन श्री जाधव तात्या यांची भेट घेतली व मी त्यांचेकडे माझे कामाविषयी चर्चा केली असुन या दरम्यान तलाठी जाधव तात्यांनी ''मी त्यांना जावुन समक्ष भेटुन

घेईल, ते काय म्हणतात तुम्हाला कळवेल'' असे बोलले होते. सदर बाबत दि. 10/02/2024 रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा पंचांसमक्ष करण्यात आलेला आहे.
त्यानंतर दिनांक 16/12/2024 रोजी पोलीस उप अधिक्षक श्री बडगुजर साहेब व पथक हे शासकीय पंचांसह सावकी फाटा सटाणा येथे आल्यानंतर मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने सर्कल साळी भाउसाहेब सटाणा हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी मला व पंच श्री. राजेश वाडेकर अशांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन माझेकडे व्हाईस रेकार्डर चालु करून देवुन मंडळ अधिकारी कार्यालय सटाणा येथे सर्कल साळी भाउसाहेब यांचे भेटीसाठी रवाना करण्यात आले. सदर वेळी सर्कल साळी भाउसाहेब यांनी तलाठी तात्या ठेंगोडा हे दुपारी मंडळ अधिकारी कार्यालयात येणार असुन दोन वाजेनंतर या असे सांगितले. त्यानंतर दुपारी 2 वाजेनंतर मला व पंच श्री. राजेश वाडेकर अशांना पुन्हा पडताळणी कारवाईकामी माझेकडे व्हाईस रेकार्डर चालु करून देवुन मंडळ अधिकारी कार्यालय सटाणा येथे सर्कल साळी भाउसाहेब यांचे भेटीसाठी रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी सर्कल साळी भाउसाहेब व तलाठी जाधव तात्या यांचेशी भेट झाली. सदर वेळी तलाठी जाधव तात्या ठेंगोडा यांनी ''बोलणे झाले भाउसाहेबांशी उदया येतो व उदया सांगतो, वगैरे बोलुन ऐका ना ऐका ना दोन मिनिट असे म्हणत त्यांचे मोबाईलचे स्क्रिनवर 15,000 असा आकडा टाईप करून दाखवुन लाचेची मागणी केली तसेच ''अजुन तुमचे मध्ये आहे ना ते होउन सगळ'' वगैरे बोलले त्यावेळी मी त्यांना 'तुम्ही दोघे मिळुन पंधरा हजार?' असे विचारले. तेव्हा तलाठी तात्या तेथुन घाई घाईने निघुन गेले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे पुन्हा सर्कल भाउसाहेब यांचे कार्यालयात गेल्यावर त्यांनी, ''तात्यांनी सांगितल ना तुम्हाला, उदया सागतील ते'' असे म्हणुन तलाठी जाधव तात्या यांचे म्हणण्यास दुजोरा दिला. सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा पंचांसमक्ष करण्यात आलेला आहे.
त्यानंतर दि. 17/12/2024 रोजी पोलीस उप अधिक्षक श्री बडगुजर साहेब, सापळा पथक असे दोन्ही पंचांसह सावकी फाटा, सटाणा येथे आल्यावर तलाठी जाधव तात्या व सर्कल साळी भाउसाहेब यांचे मागणीनुसार ते लाचेची रक्कम स्विकारतात काय? या करीता मला शासकीय पंचांसोबत लाचेच्या रकमेसह तलाठी कार्यालय ठेंगोडा येथे तलाठी जाधव तात्या यांची भेट घेण्यासाठी पंचासह रवाना केले. तेथे गेल्यावर तलाठी जाधव तात्या हे लाचेच्या मागणी व्यतिरिक्त इतर विषयांवर बोलणे करून मागणी केलेली लाचेची रक्कम न स्विकारता कार्यालयातुन निघुन गेले. सदर बाबत सविस्तर सापळा पंचनामा पंचांसमक्ष करण्यात आलेला आहे.
त्यानंतर मी दिनांक 27/12/2024 रोजी तलाठी जाधव तात्या यांची तलाठी कार्यालय ठेंगोडा येथे जावुन तसेच सर्कल साळी भाउसाहेब यांची मंडळ अधिकारी कार्यालय सटाणा येथे जावुन भेट घेतली परंतु त्यानी माझेशी मागणी केलेल्या लाचेच्या अनुशंगाने काहीएक बोलणे केले नसुन ते मला टाळण्याचा प्रयत्न करीत होते. यावरून माझी खात्री झाली की, सर्कल साळी भाउसाहेब तसेच तलाठी जाधव तात्या हे आता त्यांनी माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत. त्याकरीता त्यांचेविरूध्द कायदेशीर कार्यवाही करणे बाबत मी दि. 27/12/2024 रोजी लाप्रवि कार्यालयात जबाब दिलेला आहे.
त्यादरम्यान मी प्राप्त केलेल्या ऑनलाईन माहीती मध्ये मला असे समजले की, दि. 29/10/2024 रोजी सटाणा मंडळ अधिकारी कार्यालय येथील सर्कल संजय साळी भाउसाहेब यांनी ''खरेदी केलेले क्षेत्र जिरायत आहे की बागायत आहे हे कागदपत्रावरून सिध्द होत नाही सबब नोंद नामंजुर'' असा शेरा मारून नोंद नामंजुर केली होती. तसेच जाधव तात्या तलाठी ठेंगोडा यांनी दिनांक 17/12/2024 रोजी, म्हणजे लाच मागणी केल्याचे दुसरे दिवषी इतर फेरफार प्रकारात माझे मुलाचे नाव सातबारा उता-यावर नमुद करण्याकामी ''वडील रामसिंग विठ्ठल ठोके यांच्या नावाचा सातबारा सोबत जोडला आहे असे'' असे नमुद करून त्यावर मंडळ अधिकारी सटाणा श्री. साळी भाउसाहेब यांनी ''खरेदी घेणार यांनी शेतकरी पुरावा म्हणुन त्यांचे वडील यांचा मौजे ठेगोडा ता. बागलाण जि. नाषिक येथील गट नं. 228/6 चा 7/12 उतारा जोडला आहे. दुय्यम निबंधक बागलाण जि. नाशिक यांचेकडील खरेदीदस्त क्र. 4624 दिनांक 09/10/2024 सुची क्र. 2 प्रमाणे नोटीस रूजु, नोंद प्रमाणित'' असा उल्लेख करून माझे मुलाचे नावाची नोंद प्रमाणीत केलेली आहे. अशा प्रकारे माझे मुलाचे नावाची नामंजुर केलेली नोंद मी कोणत्याही प्रकारे नविन अर्ज केलेला नसतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे मी तक्रार केल्याचा संषय आल्याने तलाठी जाधव तात्या व सर्कल साळी भाउसाहेब यांनी माझे मुलाचे नावाची नविन नोंद टाकुन ती प्रमाणीत करून दिलेली आहे.
अशा प्रकारे तलाठी कार्यालय ठेंगोडा येथील तलाठी योगेश ज्ञानेश्वर जाधव तात्या यांनी दि. 16/12/2024 रोजी मंडळ अधिकारी कार्यालय सटाणा येथील सर्कल संजय गंगाधर साळी सटाणा यांचे सांगणेनुसार माझेकडे मुलाचे नाव सातबारा उता-यावर लावुन देण्याचे मोबदल्यात माझेकडे 15,000/- रू लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दशविली असुन लाच स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन त्यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी पैशांच्या स्वरूपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केल्याने माझी त्यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाप्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.
समक्ष ही फिर्याद दिली सही
दि. 11/03/2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
BAJIRAW MAHADEV POWAR(I (Inspector)) / 100 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
रामलिंग विठ्ठल ठोंबरे

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
सटाणा पो.ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BAJIRAW MAHADEV
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 100